FORM-1A N.C.R.B. I.I.F.-I

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

0154166

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station लाप्रवि, पहिली खबर क्र. FIR No. 08, वर्ष Year 2029, दिनांक Date 9/3/2029

2. (i) अधिनियम Act भ्र. प्र. अधि. १९८८, कलमे Sections ७, ७(अ)
   (ii) अधिनियम Act ..., कलमे Sections ...
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day ..., तारीख पासून Date from 18/9/2029, वेळ Time ..., ते तारीख पर्यंत Date to 29/9/2029, वेळ Time 19:30 वा.
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 20/9/2029, वेळ Time 18:00 वा.
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 36, तारीख Date 9/3/2029, वेळ Time 14:40 वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information लाचेच्या मागणी संदर्भात, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ई वॉर्ड, मुंबई महानगरपालिका भायखळा मुंबई, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No. ...
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name ..., ठिकाणाचे नंबर No. if any ..., गल्ली Ward ..., रस्त्याचे नाव Name of road ...
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ..., गाव Village ..., पोस्ट Post ..., तालुका Taluka ..., जिल्हा Dist. ..., राज्य State ...
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ..., तालुका Taluka ..., जिल्हा Dist. ..., राज्य State ...

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name हिराभाई सोसा
   (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name जेठाभाई सोसा
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ४९ वर्षे
   (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय, फोन नं. Phone No. 9820796703
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ..., दिल्याचा दिनांक Date of Issue ..., दिल्याचे ठिकाण Place of Issue ..., (f) व्यवसाय Occupation ...
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste ..., जनजात Sub-Caste ...
   (h) पत्ता Address बी/१ तळ मजला, श्री बिल्डिंग, रानडे रोड, दादर पश्चिम, मुंबई २८ (गल्ली / सर्वे नं. Ward, घर / बिल्डिंग नं. House/Name No., फोन / मो. नं. Phone/Mo. No., पॅन नं. PAN No., वोटर्स नं. Card No.)
   रस्त्याचे नाव Road ..., जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ..., गाव Village ..., पोस्ट Post ..., पो. स्टे. P. Stn. ...
   तालुका Taluka ..., जिल्हा Dist. ..., राज्य State ..., सध्याचा पत्ता Present Address ...

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

   राजाराम देवकाते, लिपीक ई वॉर्ड, मुंबई महानगरपालिका भायखळा मुंबई

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lvs.)-2-2018-PA3-(K) 829

Scanned with CamScanner

यातील फिर्यादी हिराभाई जेठाभाई सोसा यांचा दि. १/३/२०२१ रोजीचा फिर्यादी जबाब स्वतंत्र पानावर टेकालिखीत करण्यात आलेला आहे. त्यास सदर गुन्ह्याचा प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात येत आहे.

समक्ष

[signature]

किशोर शेवते
पोलीस निरीक्षक
लाप्रवि मुंबई

[signature] H. J. Sosa.
Hirabhai J. Sosa.

Scanned with CamScanner

फिर्याद दिनांक – ०१/०३/२०२१.

श्री. हिराभाई जेठाभाई सोसा , वय–४९ वर्षे, धंदा– रेडीमेड कपडे विक्री, रा.ठि. पी/१, तळ मजला, श्री बिल्डींग, रानडे रोड, दादर पश्चिम, मुंबई ४०००२८. मो.नं. ९८२०७९६७०३

---

मी वर नमूद ठिकाणी माझे जन्मापासून माझे संपुर्ण कुटुंबा समवेत राहत आहे. माझा व्यवसाय रेडीमेड कपडे विक्री असुन त्यातुन मिळणाऱ्या उत्पन्नातुन माझे कुटूंबाचा उदरनिर्वाह चालतो. तसेच मी कन्झ्युमर्स सोशल वर्क संस्था, दादर मुंबई या संस्थेचा खजिनदार असुन आमची संस्था गरीब व अन्याय झालेल्या लोकांना मदत करण्याचे काम करते. माझी पुतणी उर्वशी परमार यांची सासू मुंबई महानगरपालिकेमध्ये कामाला होती. तिच्या जागी उर्वशीने तिचा नवरा शांतीलाल परमार यास वारसा हक्काने नोकरी/पी.टी. केस फाईल मिळण्याकरिता ई वॉर्ड मुंबई महानगरपालिका प्रशासकीय अधिकाऱ्याकडे अर्ज केला होता. परंतु पी.टी. केस फाईल चे काम करणारे लिपीक राजाराम देवकाते हे काम करण्यासाठी दोन लाख रूपये रक्कमेची लाच मागत असल्याबाबत तक्रार अर्ज पुतणी उर्वशी परमार हिने मी खजिनदार असलेल्या कन्झ्युमर्स सोशल वर्क संस्था, दादर मुंबई या कार्यालयात माझ्या नावे दिला म्हणून अर्जावर चौकशी करण्याकरिता दि. १८/०१/२०२१ रोजी मी माझी पुतणी उर्वशी आणि माझे मित्र विनोद गिलातर असे ई वॉर्ड मुंबई महानगरपालिका कार्यालयात गेलो तिथे काम करणारे लिपीक राजाराम देवकाते यांना भेटलो असता लिपीक राजाराम देवकाते यांनी पी.टी. केस फाईल पुढे पाठविण्यासाठी दोन लाख रूपयांची मागणी केली व त्यापैकी पन्नास हजार रूपये ॲडव्हांस मागितले पण आम्हाला मागितलेली लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी लिपीक राजाराम देवकाते यांचेविरूध्द कायदेशीर कारवाई होणे करिता दि. २०/०१/२०२१ रोजी ला.प्र.वि. मुंबई कार्यालय येथे समक्ष हजर राहून पोलीस निरीक्षक विजयकुमार डोके यांच्याकडे लेखी तक्रार अर्ज दिला. सोबत आमच्या कन्झ्युमर्स सोशल वर्क संस्था, दादर मुंबई या संस्थेच्या लेटरहेडवर इंग्रजी भाषेतील तक्रार अर्ज, पुतणी उर्वशी परमार हिने माझ्या नावाने दिलेला अर्ज तक्रार अर्जासोबत लाचेची रक्कम उल्लेख केलेल्या कागदाच्या तुकडयाची झेरॉक्स सादर केली व त्यादिवशी कार्यालयीन वेळ संपल्याने दुसऱ्या दिवशी दि. २१/०१/२०२१ रोजी पंचासमक्ष पडताळणीकरिता ई वॉर्ड मुंबई महानगरपालिका कार्यालयात लिपीक राजाराम देवकाते यांची भेट घेण्यासाठी जाण्याचे ठरले.

मी दि. २१/०१/२०२१ रोजी सकाळी ला.प्र.वि. कार्यालयात हजर झालो त्यावेळी पो.नि. विजयकुमार डोके व स.पो.आ. अलका देशमुख हया सुध्दा हजर होत्या. त्यानंतर दोन पंचाना ॲन्टी करप्शन ब्युरो, मुंबई कार्यालयात बोलावण्यात आले. त्यानंतर मी दिलेला दि. २०/०१/२०२१ रोजीचा तक्रार अर्ज पंचाना समजावून सांगून तो तक्रार अर्ज पंचाना वाचण्यास दिला. त्यानंतर सदर तक्रार अर्जावर पंचाच्या सहया घेण्यात आल्या व समक्ष म्हणुन पो.नि. विजयकुमार डोके यांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पो.नि. विजयकुमार डोके तसेच मी, पंच, आणि पडताळणी पथक डीजीटल व्हॉईस रेकॉर्डर व मायक्रो एस.डी.कार्ड सह पडताळणी करण्याकरीता लोकसेवक राजाराम देवकाते काम करत असलेल्या ई वॉर्ड मुंबई म.न.पा. भायखळा कार्यालयात रवाना झालो. पो.नि. डोके यांनी मला व पंच यांना खबरदारीच्या सुचना दिल्या. तसेच पो.नि. डोके यांनी डीजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून माझ्या शर्टच्या आतील बनियनला लावून मला व पंच यांना लोकसेवक यांची भेट घेण्यासाठी पाठवून दिले.

(signature)
विजय डोके
पोलिस निरिक्षक
लाप्रवि, मुंबई

H. J. Sosa.
Hirubhai. J. Sosa...

Scanned with CamScanner

मी व पंच माघाडे हे लोकसेवक यांची भेट घेण्याकरिता मुंबई म.न.पा, ई वॉर्ड, भायखळा येथील इमारतीच्या पहिल्या मजल्यावर गेलो. लोकसेवक देवकाते जेवायला गेले असल्याचे समजले. काही वेळ इमारतीच्या खाली वाट पाहिली व त्यानंतर पुन्हा पहिल्या मजल्यावर गेलो. तेथे थोडावेळ वाट पाहून मी व पंच लोकसेवक देवकाते यांना भेटलो व माझे व लोकसेवक देवकाते यांचेत झालेले संभाषण थोडक्यात पुढीलप्रमाणे "तुम्ही परवा ०२ लाख सांगितले होते. ३० हजार जमा झाले" त्यावर लोकसेवक देवकाते म्हणाले की, "मी काम करतो बाकीचे मला काही माहित नाही. तुम्ही मला काही बोलू नका. मी तुमचं काम करून देतो. ठीक हाय. जे झाले असेल प्लीज साहेब मला प्लीज झाले असेल सोडून दया विषय तुमचं काम करून देतो बाकीचा विषय घोळू नका. की काय नाय. मी तुमचं काम करून देणार. मला बाकीच काय नको. जे झाल असेल ती गलती झाली असून माझी सॉरी बाबा होवून माफी मागतो. पण मी तुमचं काम करून देतो." असे उत्तर दिले. त्यानंतर मी व पंच माघाडे सापळा पथक असलेल्या ठिकाणी आलो."

त्यानंतर पो.नि. डोके, मी, पंच आणि सापळा पथक सर्वजण ला.प्र.वि. कार्यालयात आलो त्यावेळी माझ्या व लोकसेवक देवकाते यांच्यामध्ये झालेले संभाषण पो.नि. डोके यांनी पंचासमक्ष ऐकले सदर पडताळणी वेळी ध्वनीमुद्रीत सभांषणाचे पंचासमक्ष ट्रान्सक्रिप्ट तयार करण्यात आले.

मी " दि. १८/०१/२०२१ रोजी लोकसेवक देवकाते यांना भेटण्यासाठी त्यांच्या कार्यालयात गेलो असता कार्यालयात आमचे व लिपीक देवकाते यांचे मध्ये झालेल्या संभाषणाचे व्हिडीओ रेकॉर्डीग माझे तसेच माझी पुतणी उर्वशी हिचे मोबाईलमध्ये करण्यात आले आहे व लिपीक देवकाते यांनी हाताने कागदावर लाचेच्या रक्कमेबाबत नमुद केलेला कागदाचा तुकडा माझ्याकडे आहे" अशा आशयाचा तक्रार अर्ज दिला होता त्यावर वरिष्ठ अधिकारी यांनी मला सांगितले की, "तुम्ही तुमच्या मोबाईलमधील व्हिडीआ रेकॉर्डीग व मोबाईल आणि कागदाचा तुकडा समक्ष सादर करा. त्यातील संभाषणाचे ट्रान्सक्रिप्ट पंचा समक्ष ऐकून तयार करण्यात येईल आणि कागदाचा तुकडा व मोबाईल सविस्तर पंचनामा करून ताब्यात घेण्यात येईल "

त्यानंतर दि. २५/०१/२०२१ रोजी लाप्रवि कार्यालयात पो.नि. अमोल शिंदे व शासकिय पंच यांचे समक्ष माझ्या मोबाईल मधिल व्हिडीओ रेकॉर्डीग संभाषणा बाबतचे ट्रान्सक्रिप्ट तयार करण्यात आले. तसेच पुतणी उर्वशी हिचे मोबाईल मध्ये सुदधा व्हिडीओ रेकॉर्डीग करण्यात आले होते. संभाषणादरम्यान लोकसेवकाने एका सफेद कागदाच्या तुकडयावर लाचेची रक्कम लिहुन दिली होती. तो कागदाचा तुकडा आणि पुतणी उर्वशी हिचा व्हिडीओ रेकॉर्डीग केलेला मोबाईल ताब्यात घेणेबाबतचा पंचनामा करण्यात आला आहे.

माझे व लोकसेवक देवकाते व माझे मित्र विनोद गिलातर यांच्यात दि.१८/०१/२०२१ रोजी झालेले संभाषण पुढीलप्रमाणे

| | |
|---|---|
| तक्रारदार यांचे मित्र विनोद | आणि पार्टीला कस काय करायच ते सांगा |
| लोकसेवक | तुम्ही सांगयचं काय करायचं.... |
| तक्रारदार यांचे मित्र विनोद | त्यादिवशी तुम्हीच सांगितले होते की पाहिजे |

Whrawhr
किशोर शेवते
पोलिस निरिक्षक
लाप्रवि. मुंबई.

H. J. Sosa.
Hirubhai. J. Sosa.

Scanned with CamScanner

| | |
|---|---|
| तक्रारदार | किती किती दयायचे |
| लोकसेवक | तुमच्या मनाने |
| तक्रारदार | मला स्पष्ट सांगा..कारण मी तीचा काका आहे. पैसे मला दयायचे आहे. हा बरोबर ते तर कॅन्सल केल्याशिवाय होणार नाही.तरी पण मी काय सांगतोय.. किती लागल खर्च येईल. ते मला सांगा तुम्ही देयाचे यांना. देयाचे मला नोकरी माझ्या जावयाला. पाहिजे तुम्ही सांगा स्पष्ट. मला तुमच्या हातात माझी भतीजी पुतणी येउन देणार तुम्हाला |
| लोकसेवक | हरकत नाय बर का तुम्ही कोणतरी जबाबदारी राहना जबाबदारीने त्यांना त्यांना धरणार |
| तक्रारदार | मी तेच सांगतो तुम्ही मला स्पष्ट सांगा ऐवढा खर्च येणार आणि कसं टप्प्या टप्प्या ने पैसे कसे देयाचे ते सांगा तुम्ही त्यांना मधी आणू नका पैसे मला दयायचे आहे नोकरी हयांना पाहीजे आहे त्यांना तुम्ही मधी आणू नका हे बोललो आहे मी हे सांगितलं आहे मी हे करायचे आहे अगोदर पहले किती करायचं पन्नास हजार |
| लोकसेवक | नंबर कॅन्सल करायचं |
| तक्रारदार | मला कळवा कि दोन कि पन्नास हजार दोन काय आहे.... हि टोटल येवढी लागणार आहे..... आपल्या हयाला मिळून दोन लाख रुपये खर्च येणार आहे आणि हयाला हे लागतील आपल्याला पन्नास हजार पन्नास हजार कॅन्सल करायला |
| लोकसेवक | मंजूरी च्या वेळेस पुढचे... |
| तक्रारदार | मी काय म्हणतोय दोन लाख रुपये खर्च लागेल आणि पन्नास हजार रुपये पहले दयाला लागतील कि वेगळे लागतील.... |
| लोकसेवक | हे कॅन्सल करणार साठी |
| तक्रारदार | पन्नास हजार म्हणजे अडीच लाख लागतील |
| लोकसेवक | नाही.त्यात होईल या दोन मध्ये हाईल. |
| तक्रारदार | हे तुम्हाला दोन लाख रुपये दयायचे आहे हयात कोणा कोणला दयायचे आहे शेवट पर्यत तुम्हीच करणार.. |
| लोकसेवक | शेवट पर्यत मीच करणार. |
| तक्रारदार | पन्नास नको घ्या पंचवीस घ्या. |
| लोकसेवक | पुढे दयायला लागतात. हा आमच्या वर कोण हाय |
| तक्रारदार | तर कोणाला दयायचं ग्रॅन्टरोडला |
| लोकसेवक | कामगार अधिकारी आहे तिथं लिपीक आहेत क्लार्क आहे मला एकटयाला नाय घेयचं आणि तुमचा जर तसा गैरसमज असेल तस पण तुमचं काम करतोय.... |
| तक्रारदार | मी काय सांगतोय तुम्हाल पंचवीस देतो कन्सल झाल्यावर परत पंचवीस देतो तितकाच खर्च येईल. आता तुम्हाला पन्नास देयायचे पन्नास हजार देयायचे |
| लोकसेवक | ऐका जिथे संगळी फाईल तयार होवून साईनला जाईल |
| तक्रारदार | तुम्ही मला लिहुन घ्या सगळं पन्नास हजार आता दयायचे... |
| लोकसेवक | साईनच्या वेळेस हे बाकीचे बस काय तोंडी लक्षात राहील लिहुन दयायची काय गरज हाय काय करता लिहून हयाची काय गरज हाय काय करता हे घेवून.... |
| तक्रारदार | पन्नास आता देयायचे आणि नंतर मग जे दोन मधले उरलेले दिड नंतर दयायचे |
| लोकसेवक | हो साईनच्या वेळेस इथे साईन जेव्हा करताना त्यावेळेस असा आहे |
| तक्रारदार | ठिक हाय उदया मी एक काम करतो तुम्हाला मी पंचवीस देतो |
| लोकसेवक | नंतरच करा सगळं हि चिठठी कश्याला नेताता नका नेऊ काय करायचं. |
| तक्रारदार | केव्हा देउ तुम्हाला |
| लोकसेवक | तुम्ही सगळ संगतीच आना |

Witness
किशोर शेवते
पोलिस शिपाई
ला.प्र.वि., मुंबई

H. J. Sosa.
Hirubhai J. Sosa.

Scanned with CamScanner

अशा आशयाचे थोडक्यात संभाषण झालेले आहे. सदर संभाषणाचे सविस्तर ट्रान्सस्क्रिप्ट तयार करण्यात आले आहे. सदर लोकसेवक आणि आमच्यात झालेल्या संभाषणादरम्यान मी कामासाठी लोकसेवक यांना विचारले असता दोन लाख खर्च येईल पैकी पन्नास हजार कॅन्सल करायला पहले दयायला लागतील मला रक्कम न समजल्याने कागदावर लिहुन देण्यास सांगितलेवर लिपीक देवकाते यांनी कागदाच्या तुकडयावर ५०, गलाल, १ते ५ व साईन च्या वेळेस बाकीचे असे लिहुन दिले सदरचे झालेले संभाषणाचे ट्रान्सक्रिप्ट तयार करून व लिपीक देवकाते यांनी लाचेची रक्कम लिहुन दिलेला कागदाचा तुकडा व व्हिडीओ रेकॉर्डींग केलेला मोबाईल पंचनाम्याने जप्त करण्यात आलेला आहे.

तरी दि. १८/०१/२०२१ रोजी मी आणि माझी पुतणी उर्वशी यांनी केलेल्या मोबाईल रेकॉडिंगमध्ये तसेच कागदाच्या तुकडयावर लिहलेल्या लाचेच्या रक्कमेवरून लोकसेवक राजाराम देवकाते, लिपीक, ई वॉर्ड भायखळा, मुंबई महानगरपालिका यांनी माझ्याकडे माझी पुतणी उर्वशी परमार यांची सासू मुंबई महानगरपालिकेमध्ये कामाला होती. तिच्या जागी उर्वशी हिचा नवरा शांतीलाल परमार यास वारसा हक्काने नोकरी/पी.टी. केस फाईल पुढे पाठविण्यासाठी कायदेशीर परिश्रमाखेरीज स्वत:च्या फायदयाकरीता दोन लाख रूपयांच्या लाचेची मागणी केली व त्यापैकी पन्नास हजार रूपये लाच म्हणून अॅडव्हांस मागितले म्हणून लोकसेवक राजाराम देवकाते, लिपीक, ई वॉर्ड भायखळा, मुंबई महानगरपालिका यांच्याविरुध्द् माझी कायदेशीर तक्रार आहे.

माझा जबाब मराठीत संगणकीकृत केला असून तो मी वाचुन पाहिला असता तो मी सांगितल्या प्रमाणे बरोबर आहे.

h. J. Sosu.
Hirubhai J. Sosa.

समक्ष

( किशोर शेवते )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Scanned with CamScanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ......... चौकशी अंती गुन्हा दाखल

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद वेळ, तारीख व ठिकाणी यातील आलोसे राजाराम देवकाते लिपीक ई वॉर्ड मुंबई मनपा भायखळा यांनी यातील तक्रारदार यांची पुतणी रुचीशी परमार हिचे पती [illegible]तीलाल परमार यांस मुंबई मनपामध्ये वारसा हक्काने नोकरी / पी.टी.केस संदर्भातील फाईल पुढील योग्य त्या मंजूरीसाठी पाठविण्याकरीता तक्रारदार यांच्याकडे स्वतःच्या गैर फायद्याकरीता कायदेशीर परिश्रमाशिवाय दोन लाख रूपये लाचेची मागणी करुन अडव्हान्स म्हणून पन्नास हजार रूपये लाच स्विकारण्याचे मान्य केले म्हणून आलोसे यांचे विरुध्द भ्र.प्र.अधि. १९८८ कलम ७, ७(अ) अन्वये गुन्हा नोंद

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

..........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .........., जिल्हा .........., राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.).......... Rank.......... No.......... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.......... (3) Transferred to P. S. .......... District.......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.) H. J. Sosu.

Hirubhai J. Sosu.

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name किशोर विठ्ठल शेवते
पदनाम Rank.......... पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ..........
Posting
Code No. of I. O. ..........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख..........
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with CamScanner